रे.मु.क्र.७५९/२०२२
नि.१९ लगत जोड.

**प्रतिवादीतर्फे सा.क्र.१ यांचा उलटतपास वादीतर्फे विधीज्ञ श्री.टी.डी. उबाळे यांच्यामार्फतः**

मी दावा मिळकतीचे ७/१२ उतारे पाहीले आहेत. दावा मिळकतीचे ७/१२ उतारे मी सन २००० च्या आधीपासुन पाहीले आहेत.

प्रश्न- दावा मिळकत तुमच्या खरेदी मालकीची आहे असे म्हणणे बरोबर होईल का?
उत्तर- होय.

माझ्या वडीलांनी कोणत्या साली दावा जमिन विकत घेतली हे मला सांगता येणार नाही. गट नं.४६ पैकी माझ्या वडीलांनी ३८ गुंठे क्षेत्र विकत घेतले होते. माझ्या वडीलांनी विकत घेतलेल्या जमिनीचे खरेदीखत मी पाहीले नाही. हे मला माहीत नाही की खरेदी घेतलेल्या जमिनीची नोंद फेरफार क्र.६९८ अन्वये झाली आहे किंवा कसे. वादी माझे चुलते आहेत. हे म्हणणे खरे आहे की दि.१६.८.१९९१ रोजी गट नं.४६ मध्ये वादी व माझ्या वडीलांनी एकत्रात मिळुन जमिन विकत घेतली होती. माझ्या वडीलांनी व वादींनी प्रत्येकी ३८ गुंठे जमिन विकत घेतली होती. हे मला माहीत नाही की त्या जमिनी खरेदीबाबत सन १९९१ साली नोंद मंजुर झाली होती. मी सांगतो की मी त्यावेळी दहावीत होतो.

रेमुनं.३२८/२००४ बाबत मला माहीती नाही. माझे वडील व वादी यांच्यामध्ये झालेला रेमुनं.३६२/२००१ या दाव्याचे कागदपत्र मी पाहीले नाही. रेमुनं.३६२/२००१ या दाव्यामध्ये मी पक्षकार म्हणुन सामील नव्हतो. रेमुनं.३६२/२००१ या दाव्यात नि.५६ वर दाखल असलेल्या सुलेनाम्याबाबत मला माहीती नाही व मी तो सुलेनामा पाहीला नाही. त्या वाटपासंदर्भात फेरफार क्र.१८३९ अन्वये गट नं.४६ मध्ये ० हे. ३८ आर वर साहेबराव नवले व ० हे. ३८ आर वर ज्ञानदेव नवले यांच्या नावांची नोंद असल्याबाबत मला माहीती नाही. हे म्हणणे खरे आहे की माझ्या वडीलांच्या नावे ३८ आर क्षेत्राची व वादीच्या नावे ३८ आर क्षेत्राची नोंद ७/१२ उता-यावर वेगवेगळी झाली होती. मी सांगतो की ती नोंद माझ्याच नावे आहे. हे म्हणणे खरे नाही की गट नं.४६ मधील झालेल्या

सुलेनाम्याप्रमाणे माझ्या वडीलांच्या नावे ३८ आर क्षेत्राची नोंद होणे संयुक्तीक होते.

प्रश्न- तुमच्या वडीलांच्या नावे ३८ आर क्षेत्राबाबत सुलेनाम्यात नमुद होतेतर त्यापेक्षा जास्त क्षेत्राची नोंद तुमच्या वडीलांच्या नावे झाली तर ती नोंद चुकीची असेल असे म्हणणे बरोबर होईल का?

उत्तर- नाही.

सुलेनाम्यातील नमुद प्रत्येकी ३८ आर क्षेत्र दिल्याबाबत मी मजकुर वाचला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की तो मजकुर मी आजपर्यंत वाचलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की त्या सुलेनाम्यात गट नं.४६ मधील ३८ आर क्षेत्र हे वादीचे व ३८ आर क्षेत्र हे प्रतिवादीचे खरेदीचे असल्याने ते त्यांच्या हिश्यास ठेवले आहे असा उल्लेख केला होता. मी सुलेनाम्यातील मजकुराबाबत कोर्टात कुठे दावा दाखल करुन आक्षेप घेतला नाही. हे म्हणणे खरे नाही की वादीने दि.७.९.२०२२ रोजी त्याच्या ३८ आर क्षेत्रात कांद्याचे पिक काढले होते व त्यावेळी मी वादीला हरकत अडथळा करायला सुरुवात केली होती. हे म्हणणे खरे आहे की फेरफार क्र.६९८ बाबत मी आजपावेतो कुठेही महसुल दप्तरी व न्यायालयात दावा दाखल केला नाही. हे म्हणणे खरे आहे की ग्रामपंचायत मिळकत नं.२२९ व २३२ वर माझ्या नावाची मालकीहक्काने नोंद नाही. हे म्हणणे खरे आहे की ग्रामपंचायत मिळकत क्र.२२९ व २३२ हे एकत्र कुटुंबाच्या उत्पन्नातुन विकत घेतल्यासंदर्भात मी कोर्टात कागदोपत्री पुरावा दाखल केला नाही.

प्रश्न- गट नं.१३६ मध्ये अर्धा हिस्सा मिळण्याबाबत तुम्ही कुठेही लेखी व तोंडी स्वरुपाची तक्रार केली नाही?

उत्तर- त्यांनी वाटुन दिलेले असल्याने मी तक्रार केली नाही.

हे म्हणणे खरे आहे की त्यांनी जमिन वाटुन दिल्याबाबत माझ्याकडे तोंडी शब्दाशिवाय कागदोपत्री पुरावा नाही. हे म्हणणे खरे आहे की ग्रामपंचायत मिळकत नं.२२९ व २३२ तसेच वाघुंडे येथील गट नं.१३६ मध्ये माझी उता-यावर मालकीहक्काने नोंद नाही. हे म्हणणे खरे आहे की गट नं.१३६ च्या उता-यावर जमिन करणा-याच्या सदरी ताब्याबाबत माझ्या नावाची नोंद नाही. हे म्हणणे खरे नाही की गट नं.४६ बाबत सन २००१ साली झालेल्या वाटपाप्रमाणे वादीच्या ताब्यात ३८

आर क्षेत्र आहे व माझ्या ताब्यात ३८ आर क्षेत्र आहे. हे म्हणणे खरे नाही की केवळ वादीच्या नावे असणा-या ३८ आर क्षेत्राची जमिन गिळंकृत करण्याच्या हेतुने मी हा खोटा जबाब देत आहे.

उलटतपास संपला.

श्रवणोत्तर स्वीकृत,
सही/-

दिनांक : ०९/०३/२०२६

( डॉ.एन.एस.सबनीस )
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर
पारनेर